स्थितीमुळे आली आहे. कामगार कल्याण केंद्राच्या नाट्यस्पर्धांमुळे कामगार रंगभूमी अजून टिकून आहे ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब.

ज्याला धड व्यावसायिकही म्हणता येणार नाही आणि प्रायोगिकही म्हणता येणार नाही पण तरीही महत्वाचा असा रंगभूमीवरचा प्रवाह म्हणजे हौशी रंगभूमी. स्वत: पदरमोड करुन केवळ नाटकांच्या आत्यंतिक आवडीमुळे नाटकं करणारी, मेहनत करुन बसवलेल्या नाटकाचे एखाद दोन प्रयोग करणारी ही मंडळी संस्था, क्लब, वेगवेगळे उत्सव ह्यांच्यासाठी हे प्रयोग करतात. हौशी रंगभूमी साधारणपणे जुन्या, गाजलेल्या, लोकप्रिय पण आता बंद पडलेल्या नाटकांचे प्रयोग करते. हौशी रंगभूमीने चांगल्या नाटकांचं आयुष्य वाढवलं. इतकंच नाही तर प्रेक्षकांच्या मध्ये नाटकाची आवड जोपासण्याचं आणि ती वाढवण्याचं महत्वाचं कार्य केलं आहे. हौशी रंगभूमीवरचे अनेक कलावंत पुढे व्यवसायात शिरले आणि यशस्वी झाले ही हौशी रंगभूमीची देणगी आहे. पण हौशी रंगभूमीवर काम करणारे शेकडो कलावंत असूनही त्यातले नाट्यपरिषदेचे सभासद किती आहेत हा प्रश्न त्यांनी स्वत:लाच विचारावा.

पथनाट्य हे प्रस्थापित नाटक-रंगभूमीला छेद देणारे आहे. त्याची प्रेरणा पारंपारिक नाटकापेक्षा भिन्न आहे. नेहमीच्या आयुष्यातील प्रचलित सामाजिक समस्या, राजकीय घटना, धार्मिक गोष्टी, चालीरीती, अंधश्रद्धा ही पथनाट्याची प्रेरणास्थानं. मनोरंजनाच्या माध्यमातून लोकशिक्षण, प्रबोधन, लोकजागृती या हेतूनं सादर केलेल्या पथनाट्यांना अनेकदा शिस्तबद्ध, लिखित संहिता नसते, उत्स्फूर्ततेचा भाग अधिक असतो. रंगभूमीची चौकट नसल्यामुळे सादरीकरणात लवचिकता असते. प्रस्थापित रंगभूमीकडे प्रेक्षकांना नाटक पहायला जावं लागतं, पथनाट्यात नाटक प्रेक्षकांकडे जातं. अनेक उत्साही, ऊर्जा असलेले कलावंत असलेल्या पथनाट्याच्या चळवळीच्या सामर्थ्याचा पूर्ण वापर होत नाही. ह्याचं एक कारण, प्रकाशित संहितांचा अभाव. पथनाट्य करणाऱ्या मंडळींनी त्यांच्या संहितेची एक प्रत, (मुळात संहिता असली तर,) नाट्यपरिषदेकडे पाठवली तर अशा पथनाट्य संहितांची एक बँक करुन नाट्य परिषदेने गरजू मंडळींना त्या उपलब्ध करुन द्याव्या अशी माझी सूचना आहे.

त्याचबरोबर पथनाट्य निर्मितीत सहभाग असणाऱ्या कलावंतांना मला एक सांगावसं वाटतं. तुमची नाटकं जाताजाता थांबून, आवर्जून पहाणारा प्रेक्षक